# इतिहास – राज्यशास्त्र

## उत्तरे : सराव कृतिपत्रिका 5 वी

**प्र. 1. (अ)**

(1) ऐतिहासिक घटनांच्या लिखित नोंदी करण्याच्या परंपरेची सुरुवात मेसोपोटेमियातील सुमेर संस्कृतीमध्ये झाली.

(2) 'कथासरित्सागर' या प्राचीन संस्कृत ग्रंथात अनेक मनोरंजक खेळ व खेळण्यांचे वर्णन आले आहे.

(3) छत्रपती शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीतील 'राज्यव्यवहारकोश' हा महत्त्वाचा कोश मानला जातो.

**प्र. 1. (ब) चुकीच्या जोड्या :**


(1) सीमाँ-द-बोव्हा – जर्मनी

(2) लाल किल्ला – उदयपूर

(3) आंतरराष्ट्रीय पर्यटन – थंड हवेच्या ठिकाणांना भेटी.

**प्र. 2. (अ)**


**(1)**




**(2)**

| | |
|---|---|
| जेम्स मिल | द हिस्टरी ऑफ ब्रिटिश इंडिया |
| जेम्स ग्रँट डफ | ए हिस्टरी ऑफ द मराठाज् |
| माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन | द हिस्टरी ऑफ इंडिया |
| श्रीपाद अमृत डांगे | प्रिमिटिव्ह कम्युनिझम टु स्लेव्हरी |
| डॉ. बाबासाहेब आंबेडकर | हू वेअर द शूद्राज |

**(3)**



**प्र. 2. (ब)**

**(1) किताब-ए-नवरस :**

(१) विजापूरचा सुलतान इब्राहिम आदिलशाह दुसरा याने दखनी उर्दू भाषेत 'किताब-ए-नवरस' हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ संगीतशास्त्राशी संबंधित आहे.

(२) या ग्रंथात गायनाला अनुकूल अशी गीते आहेत.

(३) धृपद गायकीतील गीतांना साकार करणारा आणि रसिकांना उत्तम दर्जाच्या काव्याची अनुभूती देणारा असा हा ग्रंथ आहे.

(४) संस्कृत साहित्यात प्रकट होणाऱ्या नवरसांचा परिचय संगीतशास्त्राशी संबंधित असलेल्या या दखनी उर्दू ग्रंथातून होतो.

**(2) खेळ व चित्रपट :**

(१) पूर्वीच्या चित्रपटांमधून नायक-नायिका खेळ खेळत असल्याची किंवा खेळांची दृश्ये दाखवली जात असत.

(२) अलीकडच्या काळात खेळ आणि खेळाडूंचा जीवनपट दाखवणारे हिंदी, इंग्रजी चित्रपट निघाले आहेत. 'लगान', 'दंगल' असे क्रिकेट, कुस्ती अशा खेळांशी संबंधित चित्रपट निघाले आहेत.

(३) मेरी कोम, फोगट भगिनी या खेळाडूंच्या जीवनावर चित्रपट निघाले आहेत.

(४) प्रसिद्ध धावपटू मिल्खा सिंग, भारतरत्न सचिन तेंडुलकर आणि क्रिकेटपटू महेंद्रसिंग धोनी यांच्या कारकिर्दीवरही चित्रपट निघाले आहेत. एकूण खेळ व चित्रपट यांचा संबंध मूकपटापासून आजपर्यंत घनिष्ठ राहिलेला आहे.

**(3) पर्यटनाची परंपरा :**

(१) अन्नाच्या शोधासाठी आणि सुरक्षेसाठी अश्मयुगातील माणूस सतत भ्रमंती करीत होता. पण हे त्याचे पर्यटन नव्हते. नवाश्मयुगानंतर काही उद्देशाने माणूस पर्यटन करू लागला.

(२) भारताला पर्यटनाची परंपरा प्राचीन काळापासून लाभली आहे. तीर्थयात्रा करणे, परिसरातील जत्रा-यात्रांमध्ये भाग घेण्यासाठी जाणे हे त्याचे धार्मिक पर्यटन होते.

(३) व्यापारासाठी दूरवर प्रवास केला जाई. विद्याभ्यासासाठी दूरच्या प्रदेशात जाणे असेही पर्यटन होत असे. नालंदा, तक्षशिला अशा विद्यापीठांत शिकण्यासाठी बाहेरील देशांतील विद्यार्थी येत असत.

(४) मानवाला फिरण्याची उपजतच आवड असल्याने प्राचीन काळापासून पर्यटनाला मोठी परंपरा लाभली आहे.

**प्र. 3.**

**(1)** (१) वैज्ञानिक पद्धतीत प्रयोग आणि निरीक्षण यांचा वापर करून सार्वकालिक नियम मांडणे शक्य होते.

(२) इतिहास संशोधनात घटना या इतिहासात म्हणजेच भूतकाळात घडून गेलेल्या असतात.

(३) या घटनांच्या निरीक्षणासाठी आपण तेथे हजर नसतो; त्यामुळे त्या घटनांची वर्तमानात पुनरावृत्ती करता येत नाही.

(४) एका विशिष्ट घटनेवरून इतिहासात सार्वकालीन व सार्वत्रिक नियम मांडणे व ते नियम पुन्हा सिद्ध करणे शक्य होत नसते. म्हणून इतिहास संशोधनात प्रायोगिक व निरीक्षण पद्धतींचा वापर करता येत नाही.

**(2)** (१) लाखो वर्षांच्या वाटचालीत मानव प्रगतीच्या प्रत्येक टप्प्यात नवनवी कौशल्ये अवगत करीत गेला.

(२) दगडांपासून हत्यारे तयार करणे, शेतीचे तंत्र अशी वाटचाल करीत तो विज्ञानयुगात आला.

(३) कृषी उत्पादन, वस्तूंचे उत्पादन, स्थापत्य, अभियांत्रिकी इत्यादींमध्ये बदल होत गेले.

(४) यांत्रिकीकरणामुळे उत्पादन वाढले. ही सर्व प्रगती समजून घेण्यासाठी आपल्याला तंत्रज्ञानाचा इतिहास अभ्यासावा लागतो.

**(3)** (१) प्रसारमाध्यमांद्वारे आपल्यासमोर येणारी माहिती वास्तवाला धरून असेलच असे नसते.

(२) ही माहिती देणाऱ्या प्रसारमाध्यमांचे हेतू, सरकारी धोरण, सामाजिक परिस्थिती अशा अनेक बाजू विचारात घेणे आवश्यक असते.

(३) प्रसारमाध्यमांचे पूर्वग्रह, दृष्टिकोन हेही त्या माहितीत दडलेले असतात.

(४) जर्मनीतील 'स्टर्न' साप्ताहिकाने हिटलरने लिहिलेल्या रोजनिश्या प्रसिद्ध केल्या. पुढे ती हस्तलिखिते बनावट असल्याचे सिद्ध झाले.

म्हणून प्रसारमाध्यमांद्वारे मिळणाऱ्या माहितीचे चिकित्सक आकलन करून घ्यावे लागते.

**(4)** (१) जहाज, रेल्वे आणि विमान या वाहतूक क्षेत्रांत झालेल्या प्रगतीमुळे आधुनिक काळात आंतरराष्ट्रीय पर्यटन सोपे झाले आहे.

(२) विज्ञान व तंत्रज्ञानातील प्रगती व आर्थिक उदारीकरण यांमुळे जग अधिक जवळ आले आहे.

(३) अभ्यास, व्यवसाय, चित्रपटांचे चित्रीकरण यांसारख्या विविध कारणांसाठी लोक जगभरातील ठिकाणांना भेटी देतात.

(४) खेळ, आंतरराष्ट्रीय परिषदा, संमेलने, ऐतिहासिक-धार्मिक स्थळे पाहणे या उद्देशानेही लोक जगभर हिंडत असतात. त्यामुळे आजच्या काळात लोकांचे परदेशात जाण्याचे प्रमाण पूर्वीपेक्षा वाढत आहे.

**प्र. 4.**

**(1)** कोशावर राष्ट्राची ध्येयधोरणे, जीवनमूल्ये व आदर्श, तसेच तत्त्वज्ञान आणि परंपरा या घटकांचा प्रभाव पडतो.

**(2)** 'भारतीय संस्कृती कोशा'चे संपादन महादेवशास्त्री जोशी यांनी केले आहे.

**(3)** (१) कोशांमुळे ज्ञान वाचकांपर्यंत पोहोचून त्याची जिज्ञासापूर्ती होते.

(२) कोशांमधून ज्ञान, माहिती व संदर्भ सहज आणि सोप्या पद्धतीने मिळत असल्याने वाचकाला त्याचा अभ्यास करण्याची प्रेरणा मिळते.

(३) कोश संशोधकांना व अभ्यासकांना त्यांच्या विषयाचे पूर्वज्ञान व माहिती देतात; त्यामुळे त्यात भर घालण्याची प्रेरणाही कोश देतात.

(४) कोशवाङ्मय हे राष्ट्राच्या सांस्कृतिक, बौद्धिक प्रगतीचे प्रतीक असतात. कोशांमुळे समाजाचा बौद्धिक स्तर उंचावतो.

**प्र. 5.**

**(1)** (१) स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय इतिहासलेखनात जे नवे वैचारिक प्रवाह आढळून येतात; त्यात 'मार्क्सवादी इतिहासलेखन' हा एक प्रमुख प्रवाह आहे.

(२) मार्क्सवादात वर्गसंघर्षावर भर दिलेला आहे. मार्क्सच्या विचारांवर आधारित जे इतिहासलेखन केले गेले, त्याला 'मार्क्सवादी इतिहासलेखन' असे म्हणतात.

(३) मार्क्सवादी इतिहासलेखनात आर्थिक व्यवस्थेतील उत्पादनाची साधने, पद्धती आणि उत्पादनाच्या प्रक्रियेतील मानवी संबंध यांचा प्रामुख्याने विचार केलेला आहे.

(४) प्रत्येक सामाजिक घटनेचा सर्वसामान्य लोकांवर काय परिणाम होतो, याचे विश्लेषण करणे, हे मार्क्सवादी इतिहासलेखनाचे मुख्य सूत्र आहे.

(५) मार्क्सवादी इतिहासकारांनी जातिव्यवस्थेत होत गेलेल्या बदलांचा अभ्यास केला.

(६) भारतातही या पद्धतीचा अवलंब कोसंबी, डांगे, शरद पाटील इत्यादींनी आपल्या इतिहासलेखनात प्रभावीपणे केलेला दिसून येतो.

**(2)** भारतीय चित्रपटसृष्टीच्या विकासाची वाटचाल पुढीलप्रमाणे झाली –

(१) चलत्‌चित्रणाचा शोध लागल्यावर चित्रपटकलेचा जन्म झाला. १८९९ मध्ये हरिश्चंद्र सखाराम भाटवडेकर उर्फ सावेदादा यांनी भारतात पहिला लघुपट तयार करून त्याचे प्रदर्शन केले.

(२) भारतीय चित्रपटांच्या विकासात दादासाहेब तोरणे, करंदीकर, पाटणकर, दिवेकर यांचे योगदान महत्त्वाचे आहे; कारण त्यांनी परदेशी तंत्रज्ञांचे साहाय्य घेऊन 'पुंडलिक' हा कथापट तयार केला.

(३) पुढे दादासाहेब फाळके यांनी पूर्ण लांबीचा व सर्व प्रक्रिया भारतात केलेला 'राजा हरिश्चंद्र' हा पहिला चित्रपट तयार केला. त्यांनी पुढे अनेक अनुबोधपटही तयार केले.

(४) आनंदराव पेंटर यांनी भारतात पहिला सिने-कॅमेरा तयार केला. त्यांचे मावस बंधू बाबुराव पेंटर यांनी ऐतिहासिक, सामाजिक असे अनेक चित्रपट तयार केले. भालजी पेंढारकरांनी चित्रपटांमधून राष्ट्रीय विचारसरणीचा प्रसार केला.

(५) कमलाबाई मंगरूळकर या मराठीतील पहिल्या स्त्री-चित्रपट निर्मात्या; तर कमलाबाई गोखले या चित्रपटात काम करणाऱ्या पहिल्या महिला होत. मराठीप्रमाणेच अन्य भाषांतूनही चित्रपटनिर्मिती झाली.

(६) प्रभात फिल्म कंपनीने अनेक धार्मिक, चरित्रपर, ऐतिहासिक व सामाजिक चित्रपट तयार केले. बॉम्बे टॉकीज, फिल्मिस्तान, राजकमल प्रॉडक्शन, नवकेतन, आर. के. स्टुडिओज अशा फिल्म कंपन्यांनी उत्तमोत्तम चित्रपट तयार केले. १९६१ ते १९८१ हा काळ भारतीय चित्रपटांचे 'सुवर्णयुग' मानला जातो.

**(3)** वर्तमानपत्रे व दूरदर्शन : माहिती –

| क्र. | मुद्दे | वर्तमानपत्रे | दूरदर्शन |
|---|---|---|---|
| १. | सुरुवात/पार्श्वभूमी | जेम्स ऑगस्टस हिकी याने २९ जानेवारी १७८० रोजी 'बेंगॉल गॅझेट' हे इंग्रजी भाषेतील पहिले वृत्तपत्र कोलकाता येथे सुरू केले. | १५ सप्टेंबर १९५९ रोजी भारतात प्रथम दिल्ली दूरदर्शन केंद्र सुरू झाले. |
| २. | माहितीचे/कार्यक्रमांचे स्वरूप | मुख्यतः बातम्या, लेख, अग्रलेख, लोकांची मते, जाहिराती, विविध सदरे असे वृत्तपत्रांचे स्वरूप असते. | जगभरच्या घटना, विविध मालिका, चित्रपट व गाणी, नैसर्गिक व ऐतिहासिक ठिकाणांची माहिती, मुलाखती इत्यादी कार्यक्रम सादर होतात. |
| ३. | कार्ये | (१) दैनंदिन घटनांच्या बातम्या लोकांपर्यंत पोहोचवणे<br>(२) लोकजागृती व लोकशिक्षण करणे<br>(३) माहिती पुरवणे, लोकशाही बळकट करणे<br>(४) अन्यायाला विरोध करून विकासात्मक कामांना प्रसिद्धी देणे. | (१) दैनंदिन घटना, माहिती प्रक्षेपित करणे<br>(२) लोकशिक्षण करणे, मनोरंजन करणे<br>(३) समाजोपयोगी उपक्रमांना प्रसिद्धी देणे<br>(४) सामाजिक समस्यांबाबत व वाईट रूढी-परंपरांविरुद्ध समाजप्रबोधन करणे. |

**(4)** हे वारली चित्रपरंपरेतील चित्र आहे. वारली चित्रकलाशैलीचा उदय ठाणे जिल्ह्यातील वारली आदिवासी जमातीत झाला. या चित्राविषयी माहिती—

(अ) **निसर्गाचे चित्रण :** या चित्रात काही वनस्पतींच्या फांद्या, फुलझाडे, उगवता सूर्य, पक्षी यांची चित्रे रेखाटलेली दिसतात.

(ब) **मानवाकृतींचे रेखाटन :** चित्रात स्त्री-पुरुष, खेळणारी मुले यांची चित्रे रेखाटलेली दिसतात. वारली चित्रात माणसांची हुबेहूब चित्रे नसतात. ती फक्त रेखाचित्रे असतात. त्रिकोण, चौकोन व वर्तुळ यांच्या साहाय्याने मानवाकृती रेखाटल्या जातात.

(क) **व्यवसाय :** या चित्रात शेती करणारे स्त्री-पुरुष दिसत आहेत. पशुपालन हाही या लोकांचा व्यवसाय असावा.

(ड) **घरे :** उतरत्या छपरांच्या झोपड्या चित्रात दिसतात. झोपड्यांच्या भिंती कुडांच्या किंवा मातीच्या असाव्यात. त्यावर चित्रे काढलेली आहेत.

या चित्रातून वारली समाजजीवन व्यक्त होते. हे लोक गरीब आहेत, हे जाणवते. हे लोक जसे जगतात, त्याच परिसरातील व अनुभवांतील मानवी व निसर्ग घटकांचे आकार ते रेखाटताना दिसतात.

**प्र. 6.**

**(1)** सामाजिक न्यायावर आणि समतेवर आधारलेला प्रागतिक समाज निर्माण करण्याचे संविधान हे एक महत्त्वपूर्ण साधन आहे.

**(2)** पाण्याचे नोबेल समजले जाणारे 'स्टॉकहोम वॉटर प्राइझ' भारताच्या डॉ. राजेंद्रसिंह राणा यांना मिळाले आहे.

**प्र. 7.**

**(1)** हे विधान चूक आहे; कारण—

(१) लोकशाही अधिक सुदृढ होण्यासाठी आणि नागरिक व शासन यांचा परस्परांवरील विश्वास वाढण्यासाठी शासन काय करीत आहे, हे नागरिकांना माहीत असणे आवश्यक असते.

(२) पारदर्शकता आणि उत्तरदायित्व ही चांगल्या शासनाची वैशिष्ट्ये या अधिकारामुळे प्रत्यक्षात येतात.

(३) शासनाचे व्यवहार अधिक खुले होण्यास या अधिकारामुळे मदत झाली; म्हणून माहितीच्या अधिकारामुळे शासनाच्या कारभारातील गोपनीयता कमी झाली आहे.

**(2)** हे विधान बरोबर आहे; कारण—

(१) बहुमताने अधिकारावर आलेले सरकार मुदतीआधीच पक्षफुटीमुळे अल्पमतात येऊ शकते.

(२) काही वेळा एका पक्षाला बहुमत मिळाले नसल्यास दोन किंवा अनेक पक्षांची आघाडी करून सरकार स्थापन केले जाते. परंतु मुदतीआधीच आघाडीत फूट पडून सरकार अल्पमतात येते.

(३) अल्पमतात आलेल्या सरकारला राजीनामा द्यावा लागतो. अशा वेळी पर्यायी सरकार स्थापन करण्याची शक्यता नसल्यास लोकसभा वा विधानसभा मुदतपूर्व बरखास्त करावी लागते.

अशा परिस्थितीत निवडणूक आयोगाला मध्यावधी निवडणुका घ्याव्या लागतात.

**(3)** हे विधान बरोबर आहे; कारण —

(१) लोकशाही व्यवस्था केवळ शासकीय पातळीवर असून चालत नाही; तर ती लोकांपर्यंत पोहोचली पाहिजे.

(२) लोकशाहीतील लोकांचे हक्क, स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठी सतत जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात.

(३) भ्रष्टाचार, हिंसा, गुन्हेगारीकरण यांसारख्या लोकशाहीला आव्हान देणाऱ्या समस्या वेळीच नष्ट कराव्या लागतात. त्यासाठी लोकांना आणि शासनालाही सतत दक्ष राहावे लागते.

**प्र. 8. (अ)**

**(1) प्रादेशिक पक्ष :**

(१) विशिष्ट प्रदेशाच्या वेगळेपणाचा अभिमान बाळगणाऱ्या व त्या प्रदेशाचा विकास करण्यासाठी सत्तेच्या स्पर्धेत उतरणाऱ्या राजकीय गटांना 'प्रादेशिक पक्ष' असे म्हणतात.

(२) या पक्षांचा आपल्या प्रदेशापुरता मर्यादित प्रभाव असतो. आपल्या प्रदेशाच्या विकासाबरोबरच आपल्या प्रदेशाला स्वायत्तता असावी, असा या पक्षांचा आग्रह असतो.

(३) आपल्या प्रदेशात प्रभावी भूमिका घेऊन हे पक्ष आता राष्ट्रीय राजकारणातही आपला प्रभाव टाकू लागले आहेत.

(४) प्रादेशिक पक्षांचा प्रवास फुटीरता, स्वायत्तता आणि मुख्य प्रवाहात सामील होणे अशा टप्प्यांमधून होत आहे.

**(2) भ्रष्टाचार :**

(१) कायद्याचा भंग करून, वाजवीपेक्षा अधिक पैसे घेणे, दुसऱ्यांना नाडणे याला 'भ्रष्टाचार' असे म्हणतात.


(२) भ्रष्टाचार केवळ आर्थिक स्वरूपाचाच असतो, असे नाही; तर सामाजिक, राजकीय, धार्मिक, सरकारी पातळीवर असा सर्वत्र होत असतो.

(३) अधिकारांचा गैरवापर हाही भ्रष्टाचारच असतो. निवडणुकीतील गैरप्रकार, लाच देणे वा स्वीकारणे, मालाची साठवणूक करून अधिक किमतीला विकणे हे सर्व प्रकार भ्रष्टाचाराचेच.


(४) भारतात सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रांत भ्रष्टाचार ही मोठी समस्या बनलेली आहे. वाढत्या भ्रष्टाचारामुळे लोकांचा लोकशाहीवरील विश्वास उडू शकतो.

**प्र. 8. (ब)**

**(1)**




**(2)**



**प्र. 9.**

**(1)** (१) निवडणुका जाहीर झाल्यापासून निर्णय घोषित होईपर्यंत सरकार, राजकीय पक्ष, उमेदवार व मतदार यांनी कोणत्या नियमांचे पालन करावे व कोणते वर्तन करू नये, यासंबंधीची जी नियमावली निवडणूक आयोगाकडून जाहीर केली जाते, त्या आचारनियमावलीस 'निवडणूक आचारसंहिता' असे म्हणतात.

(२) निवडणुकीच्या काळात गैरप्रकार होऊ नयेत, म्हणून आचारसंहिता घोषित केली जाते. आचारसंहितेचा भंग करणाऱ्यांवर होणाऱ्या कारवाईमुळे सामान्य मतदार आश्वस्त होतो; तसेच निवडणुका खुल्या वातावरणात व निष्पक्ष पद्धतीने घेता येतात.

**(2)** राजकीय पक्षांची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे–

(१) निवडणुकांच्या माध्यमातून सत्ता प्राप्त करणे, हे राजकीय पक्षांचे मुख्य उद्दिष्ट असते.

(२) प्रत्येक राजकीय पक्षाची विशिष्ट विचारसरणी व धोरण असते.

(३) आपल्या विचारसरणीप्रमाणे प्रत्येक पक्ष आपल्या कार्यक्रमांची अंमलबजावणी करीत असतो.

(४) निवडणुकीत बहुमत मिळवणारा पक्ष सत्ताधारी बनतो; तर अल्पमतातील पक्ष विरोधी पक्ष म्हणून कार्य करतात.

(५) राजकीय पक्ष सरकार व जनता यांच्यातील दुवा म्हणून काम करून जनमताचा पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न करतात.

---

❀❀❀